दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । शुक्रवार
३.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २६७
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१




# खाकीने हात टेकले ; आरोपीं पकडायला बक्षीस



## हत्तेच्या पंचविशीत मुख्य आरोपी फरारच

**केज, (प्रतिनिधी):- मस्साजोगचे संतोष देशमुख हत्याकांडातील फरार तीन आरोपींची माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवून योग्य बक्षीस देण्याचे पोलिस विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केले आहे. खाकीने बक्षीस जाहीर करून दाखवून दिले कि आता आरोपी अटकेसाठी सामान्य जनतेला आवाहन करावे लागते. हत्या होऊन २५ दिवस उलटले तरी अपेक्षित यश मिळाले नसल्याने खाकीची हतबलता समोर आली आहे.**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण करून निर्घृणपणे हत्या केल्याची घटना ९ डिसेंबर रोजी घडली होती. याप्रकरणी केज पोलिस ठाण्यात सुदर्शन चंद्रभान घुले, कृष्णा शामराव आंधळे, सुधीर ज्ञानोबा सांगळे, महेश सखाराम केदार, जयराम माणिक चाटे, प्रतिक भीमराव घुले, विष्णू महादेव चाटे या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी महेश केदार, जयराम चाटे, प्रतिक घुले, विष्णू चाटे या चौघांना अटक केली असून ते पोलिस कोठडीत आहेत. मुख्य आरोपी सुदर्शन घुले, ▶▶पान २ वर



### मुंबई पत्रकारावर बीड चिडले

बीडच्या बदनामी साठी मुंबईचे पत्रकार अलेशान हॉटेलात पडाव टाकून आहेत. मुख्य आरोपीचे नाव बाजूला ठेऊन केवळ राजकीय हेवेदावे करत नेत्यांच्या बाईट जमा करत असल्याने लोकात नाराजी आहे. बीड ला बदनाम करणे इथे उद्योग येऊ नयेत या साठी प्रकरणाचा वापर करत मुंबई पत्रकारांनी बीडला बदनाम करू नये असे म्हटले जात आहे.

### फडणवीस धसांच्या पाठीशी



धस यांना देवेंद्र फडणवीस राजकीय पाठबळ देत असल्याने प्रकरणात सकारात्मक चर्चा आहे मराठा समाजात फडणवीस यांच्या बद्दल सकारात्मक चर्चा असून सुरेश धस यांनी देखील नेहमी फडणवीस यांचे आभार व्यक्त करत समाधान व्यक्त केले आहे.

## नव्या सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा

### राज्य मंत्रिमंडळाचा बैठकीत मोठा निर्णय



मुंबई, (वृत्तसेवा):- मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर गुरुवारी राज्य मंत्रिमंडळाची पहिली बैठक पार पडली. सध्याचं राज्यातील वातावरण पाहाता या बैठकीमध्ये काय निर्णय घेतले जाणार? या बैठकीला कोण कोण मंत्री उपस्थित असणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं? या बैठकीला उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांची उपस्थिती नव्हती. मात्र दुसरीकडे मंत्री धनंजय मुंडे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. तसेच या बैठकीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याकडून ▶▶पान २ वर

### शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीमध्ये शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकार ४ हजार ८४९ एकर जमिनी शेतकऱ्यांना परत करणार आहे, याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घोषणा केली आहे. सरकारच्या या निर्णयाचा राज्यातील ९६३ शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या वर प्रतिक्रिया देताना बैठकीत शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेतल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. याशिवाय महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-२२० मध्ये आकारी पड जमिनीच्या संदर्भात असलेल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा देखील निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

## अंबाजोगाईत इज्तेमा; टोलमाफीसाठी खा.सोनवणेंचे आयआरबीला पत्र

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):- दोन दिवसीय इज्तेमाला गुरुवार २ जानेवारीपासून अंबाजोगाई येथे प्रारंभ झाला आहे. आज सायंकाळी 'दुआ' ने समारोप होणार आहे. यासाठी परजिल्ह्यातील आणि जिल्ह्यातील मुस्लिम बांधव अंबाजोगाईला धामिर्क कार्यक्रमानिमीत्त येत असल्याने त्यांच्या वाहनांना टोलमाफी द्यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी आयआरबीचे व्यवस्थापक यांना पाठविले आहे. अंबाजोगाई सदर बाजार चौक, येथून एक किलोमिटर

**आज अंबाजोगाईत इज्तेमाचा दुवाने समारोप; सुरक्षित प्रवास करा-खा.सोनवणे**

अंतरावर चांदमारी रोड परिसरात या इज्तेमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुस्लिम धर्मगुरूचे उपदेश ऐकण्यासाठी भव्य शामियाना उभारण्यात आला असून वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी शेकडो स्वयंसेवकाची तैनाती करण्यात आली असून गुरुवार दि.२ जानेवारी रोजी पासून इज्तेमाला सुरुवात झाली आहे. याठिकाणी आज समारोपाच्या कार्यक्रमाला लाखो बांधव येणार आहेत. त्यांची कसलीही गैरसोय होणार नाही, याची आयोजक काळजी घेत आहेत. दरम्यान बीड जिल्ह्यातील मुस्लीम बांधवांच्या दृष्टीकोनातुन अतिशय महत्वाचा इज्तेमा सारखा धार्मीक कार्यक्रम ▶▶पान २ वर





## नव्या सरकारचा लाडक्या बहिणींना मोठा धक्का; या महिलांचे पैसे होणार बंद

मुंबई, (वृत्तसेवा):-मोठी बातमी समोर येत आहे, लाडक्या बहिणींना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेबाबत मोठी अपडेट दिली आहे. ज्या कुटुंबांचं उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक हातभार लागावा, या उद्देशानं ही योजना सरकारनं चालू केली होती. राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये या योजनेची घोषणा करण्यात आली, आता या योजनेबाबत मोठी अपडेट समोर येत आहे. काही महिलांना या योजनेतून वगळलं जाण्याची शक्यता आहे. डिसेंबरचा हप्ता लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झाला आहे, त्यानंतर आता ही मोठी बातमी समोर आली आहे. ▶▶पान २ वर

## अजित पवारांच्या ताफ्यात वाल्मीक कराड यांची गाडी; त्याच गाडीतून पुण्यात सरेंडर



### खासदार बजरंग सोनवणे यांचा खळबळजनक दावा

मुंबई, (वृत्तसेवा):- बीड सरपंच हत्याप्रकरणाशी निगडीत खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपी वाल्मीक कराड सध्या सीआयडीच्या ताब्यात असून त्याची चौकशी केली जात आहे. बीड खासदार बजरंग सोनवणे यांनी वाल्मीक कराड आणि अजित पवारांबाबत मोठा दावा केला आहे. अजित पवार मस्साजोगमध्ये देशमुख कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी गेले असता, त्यांच्या ताफ्यात वाल्मीक कराड यांची देखील गाडी होती, असे सोनवणे म्हणालेत. त्याच गाडीतून त्याने पुण्यात सरेंडर केले, असा दावाही बजरंग सोनवणे यांनी केला. संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणामुळे राज्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. वाल्मीक कराड हे मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय ▶▶पान २ वर

### फडणवीस यांच्याकडून पुन्हा १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## पंकजा-धनुभाऊंच्या खात्याचे सचिव कोण?

मुंबई, (वृत्तसेवा) :- मंत्रिमंडळ खातेवाटप झाल्यानंतर आणि गुरुवारी मंत्रिमंडळ बैठक आटोपताच प्रशासकीय बदलास सुरुवात झाली असून १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या राज्य शासनाकडून करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे गत सप्ताहात बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी बदली झालेल्या हर्षदीप कांबळे यांच्या बदलीचा पुन्हा गुरुवारी आदेश काढण्यात आला आहे.



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मुख्य सचिवपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गणेश नाईक यांच्याकडे असलेल्या वनविभाग खात्याच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी मिलींद म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर धनंजय मुंडे यांच्या अन्न आणि नागरी पुरवठा खात्याच्या सचिवपदी जयश्री भोज यांची नियुक्ती करण्यात आली ▶▶पान २ वर

## मढ्यावरचे 'जातकारण'



क्रॉसलाईन

चोरंबा हत्याकांड आठवते, दोन महिलांची अत्यंत नीच पद्धतीने हत्या केल्याची घटना

### कैमेरे कराडवर, घुले कुठंय?

बीडचीच, सुप्रीम कोर्टातून आरोपी सुटले, भाजपचे पराभूत उमेदवार उज्वल निकम वकील लावले काय किंवा कपिल सिब्बल लावले काय शिक्षा तेव्हाच लागते जेव्हा गुन्ह्याचा गोषवारा आणि तपास एक संगत चालतात. उद्या थोडाही संशय उरला तर कोर्ट आरोपींना सोडू शकते, आमच्याकडे मोगहम एक म्हण आहे १०० आरोपी सुटले तरी चालतील मात्र एक निर्दोषी इसमास शिक्षा होऊ नये ? संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी देखील तपास भरकटला तर आरोपीला शिक्षा होण्याची शक्यता कमी असेच आजवरच्या अनेक केसेसमधून लक्षात घ्यावे लागते. पोलिसांना पोलिसांचे कामच करू द्यायचे नाही , मुंबईचा बूम वाला मिडीया कुणाला हागायला वेळ देईना, बीडचा पिम्पली लाइव्ह केलाय, ह सांगा तुमच मत काय , आमच्या नेत्यांना आयुष्यात एवढे बूम कधी तोंडासमोर दिसले नाही त्यांनाही गोड लागते, पाच पंचवीस बूम आपली प्रतिक्रिया घेतात म्हटल्यावर ते तोंड आतून सुखावत नसेल तर नवल. बर पोलिसांना सीआयडीला सल्ले देणारे महाभाग देखील आहेत, कालचा आखा दिवस पोलीस ठाण्यात पलंग आले यावर गेला, थेट देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न होता ते



पलंग कशाला आणले. अवघा महाराष्ट्र पाहत होता वाल्मिक कराड हे ज्या ठाण्यात तिथे पलंग कसे

## राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा; मनुसह ४ जणांना खेल रत्न


### ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार, ५ प्रशिक्षकांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर



नवी दिल्ली, (वृत्तसेवा) :- क्रीडा मंत्रालयाने गुरुवारी राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ ची घोषणा केली. ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी. गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरा ॲथलीट खेळाडू प्रवीण कुमार यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय ५ प्रशिक्षकांना द्रोणाचार्य पुरस्कार आणि ३० खेळाडूंना अर्जुन पुरस्कार देण्यात येणार आहे. १७ जानेवारी रोजी राष्ट्रपती भवनात हा पुरस्कार सोहळा होणार आहे. मनू भाकरने ▶▶पान २ वर



# शेजारसौख्याची शालीनता



मालदीवमध्ये लोकनियुक्त सरकार उलथून लावण्यासाठी भारताने तेथील विरोधी पक्षीयांना निधीपुरवठा करण्याची योजना आखली होती, असा गंभीर आरोप 'द वॉशिंग्टन पोस्ट' या अमेरिकेतील पत्राने केला असून, तूर्त तरी त्याची दखल घेण्याची किंवा या वृत्ताचे खंडन करण्याची गरज भारताला भासलेली दिसत नाही. काही वदंतांना दुरूनच दुर्लक्षावे, हे धोरण त्यामागे असेल. ते योग्यच. आरोप गंभीर आहे. पण तो कोण्या देशाच्या सरकारचा नाही, तर माध्यमांकडून झाला आहे. अमेरिका, ब्रिटनस्थित माध्यमांचा आमच्याविरुद्ध आकस आहे हे एकदा धरून चालले, की प्रतिवादाचे प्रयोजन उरत नाही. शिवाय ज्या विरोधकांचा उल्लेख प्रस्तुत वृत्तात आहे, त्या कटाच्या एका 'सहनायकाने'च हे वृत्त तथ्यहीन असून भारत असे कधीही करणार नाही, असे सांगून टाकले आहे. शेजारी देशांशी संबंधांच्या बाबतीत भारतीय परिप्रेक्ष्यात शाश्वत आणि स्थिर असे काही नसते. सगळेच देश नवथर स्वतंत्र. तरी जवळपास एकातही लोकशाहीची पाळेमुळे म्हणावी तशी आणि तितकी रुजलीच नाहीत. तशात आर्थिक विषमता. बहुतेक ठिकाणी देशास खासगी मालमत्ता समजणारे सरंजामी नेतृत्व. त्यामुळे वांशिक आणि धार्मिक तेढ पाचवीला पुजलेली. स्थायी वैरभाव म्हणून पाकिस्तानचा अपवाद म्हणावा, तर त्या देशाबरोबरही शांतता स्थापनेच्या शक्यतांची उघडझाप सुरूच असते. मालदीव, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ या देशांमध्ये गेल्या १८ महिन्यांमध्ये सत्तांतर झाले. यांपैकी बांगलादेशातील भारतमित्र शासक शेख हसीना यांना जनतेच्या प्रक्षोभामुळे देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. मालदीवमध्ये मोहम्मद मुईझ्झू हे अध्यक्षपदाच्या निवडणुकीत जिंकले. त्यांनी प्रचारामध्ये भारतविरोधी भूमिका जाहीरपणे घेतली होती. भारतीय सैन्यदलांची मालदीवमधील माफक उपस्थितीही त्यांना नकोशी झाली होती. अध्यक्ष बनल्यानंतर त्यांनी प्रथम तुर्की आणि नंतर चीनला भेटी दिल्या. दोन्ही देशांशी भारताचे फारसे सख्य त्या वेळी तरी नव्हते. श्रीलंकेमध्ये अनुरा दिस्सानायके हे कम्युनिस्ट नेते अध्यक्षीय निवडणूक जिंकले. तर नेपाळमध्ये के. पी. शर्मा ओली हे पुन्हा एकदा पंतप्रधानपदी विराजमान आहेत. त्यांना चीनशी जवळीक अधिक लाभदायी वाटते. आता यांतील मालदीवच्या म्हणजे अर्थातच मुईझ्झूंच्या भूमिकेत गेल्या चार महिन्यांत लक्षणीय बदल झाला आहे. त्यांच्या भारतभेटी वाढल्या आहेत, भारताचे महत्त्व अलीकडे ते वरचेवर वदू लागले आहेत. लक्षद्वीप बेटाची पर्यटनमहती वाढावी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेथे मध्यंतरी भेट दिली होती. तो 'बाण' वर्मी लागला असावा, कारण या कृतीतून मालदीवमधील पर्यटकांचा ओढा आटला. पर्यटन हाच प्राणवायू असलेल्या चिमुकल्या कर्जबाजारी मालदीवला हे परवडणारे नाही हे मुईझ्झूंनी ओळखले आणि भारताशी संबंध नव्याने सुस्थितीत आणण्याबाबत त्यांची धावपळ सुरू झाली. हे सगळे सुरू असतानाच, 'द वॉशिंग्टन पोस्ट'मध्ये भारताला संशयात गोवणारे वृत्त प्रसिद्ध व्हावे, यामागे निव्वळ योगायोग असण्याची शक्यता कमी. हे पत्र नक्की काय दावा करते? सन २०२३च्या अखेरच्या टप्प्यात मुईझ्झू अध्यक्षपदावर निवडून आले आणि त्यांनी उघडपणे भारतास आव्हान देण्याची भूमिका घेतली. 'द वॉशिंग्टन पोस्ट'च्या मते जानेवारी २०२४ मध्ये 'रिसर्च अँड ॲनालिसिस विंग' अर्थात 'रॉ' या भारतीय गुप्तचर संस्थेने मालदीवमधील मुईझ्झूंच्या विरोधकांना हाताशी धरून एक योजना आखली. 'डेमॉक्रेटिक रिन्यूअल इनिशिएटिव्ह' नामक या योजनेअंतर्गत मालदीव पार्लमेंटमधील ४० सदस्यांना लाच देऊन त्यांच्यामार्फत मुईझ्झूंच्या विरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्याचे घाटत होते. या ४० जणांमध्ये विरोधकच नव्हे, तर मुईझ्झू यांच्या पक्षातीलही काही होते. याशिवाय पोलीस, लष्कर आणि समाजकंटक टोळ्यांच्या म्होरक्यांनाही निधीवाटप केले जाणार होते, म्हणे. पण अनेक महिने वाटाघाटी केल्यानंतरही पुरेसे सदस्य राजी झाले नाहीत, त्यामुळे योजना बारगळली असे या वृत्तात म्हटले आहे. यावर मालदीवमधील प्रमुख विरोधी पक्षाचे नेते आणि माजी अध्यक्ष, भारतमित्र मोहम्मद नशीद यांनी ठामपणे भारताची बाजू घेतली. आमच्यापर्यंत असा कोणताही प्रस्ताव आलेला नाही आणि भारत अशा प्रकारे एखाद्या देशातील लोकशाही सरकार अस्थिर करण्याची चूक कधीही करणार नाही इतक्या नि:संदिग्ध शब्दांत नशीद यांनी या वृत्ताचे खंडन केले. भारताने बुधवार सायंकाळपर्यंत तरी या दाव्यावर थेट प्रतिक्रिया देण्याचे टाळले. तरी या आरोपांचे पडसाद उमटू शकतात आणि भविष्यात त्यांची दखल घ्यावी लागू शकते. अमेरिकेतील याच पत्राने आणखी एका वृत्तलेखात 'रॉ'च्या पाकिस्तानातील कथित कारवायांविषयी सविस्तर विवेचन केले आहे. फुटकळ मारेकरी हाताशी धरून पाकिस्तानात वावरणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर किंवा भारताकडून दहशतवादी म्हणून घोषित झालेल्या काहींच्या हत्या घडवण्यात आल्या, असे यात म्हटले आहे. मोदींच्या दुसऱ्या कार्यकाळात म्हणजे २०१९ नंतर या प्रकारांत वाढ झाली, असेही 'द वॉशिंग्टन पोस्ट' म्हणते. या घटनांची संगती पुढे पन्नू-निज्जर हल्ल्यांशी लावली जाते. पाकिस्तानात जे जमले, ते अमेरिका, कॅनडामध्ये जमेलच असे नाही, असेही नमूद आहे. मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी वेळोवेळी वेगवेगळ्या संदर्भात केलेली 'घरात घुसून मारण्या'विषयीची विधाने प्रस्तुत वृत्तलेखात एकाच सूत्रात गुंफण्यात आली आहेत. एका बऱ्याचशा अविकसित किंवा अर्धविकसित टापूमध्ये आकाराने सर्वांत मोठ्या असलेल्या, लोकशाही टिकवून ठेवलेल्या, अजस्र बाजारपेठ आणि कुशल मनुष्यबळ विकसित झालेल्या देशाचे अस्तित्व इतरांसाठी दखलपात्र असणारच. या इतर देशांमधील विविध उपक्रमांमध्ये भारतासारख्या क्षेत्रीय महासत्तेचा सहभागही असणारच. हा 'सहभाग' म्हणजे 'हस्तक्षेप' ठरवण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत आणि इच्छा असो वा नसो, पण त्यांची दखल आपल्याला घ्यावी लागणार आहे. कॅनडा, अमेरिकेपाठोपाठ तिसऱ्या देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप भारतावर झाला. आधीच्या दोन प्रकारांमध्ये तेथील सरकारांनी प्रथितयश आणि विश्वासार्ह माध्यमांची दखल घेऊन पुढील कार्यवाही सुरू केली होती, हे विशेष उल्लेखनीय. मालदीवबाबतच्या वृत्तात तथ्य नाही, असे मानले तरी भारताला याबाबत काही तरी भूमिका घ्यावी लागेल. परदेशी माध्यमे आपल्या 'वाईटावर' आहेत असे खुशाल मानूनच सावधगिरी बाळगली पाहिजे. परदेशात खून घडवून आणण्याचे भारताचे धोरण नाही, असे परराष्ट्र खात्याने वेळोवेळी स्पष्ट केलेले आहे. तरीदेखील निज्जरचे भूत अजूनही आपल्या मानगुटीवरून उतरलेले नाही आणि पन्नू हत्या कटातून आपली सोडवणूक झालेली नाही. त्यात आता हे मालदीवचे प्रकरण. दुसऱ्या देशात जाऊन हत्यासत्रे, कटकारस्थाने रचण्याचे प्रकार अमेरिका, रशिया, इस्रायल, इराण हे देश करत आले आहेत. त्यातून सावरण्यासाठी आवश्यक चतुराई, मुजोरी किंवा आंतरराष्ट्रीय पाठबळ या देशांकडे होते. ते जेव्हा आटते, त्या वेळी काय होते हे समजून घेण्यासाठी विस्कळीत, विदग्ध इराणचे उदाहरण पुरेसे आहे. त्या मार्गाने जाण्याची भारताला अजिबात गरज नाही, हे 'लोकसत्ता'ने वेळोवेळी मांडले आहे. असले विकतचे बाहुस्फुरण घेऊन वावरणे यालाच सामर्थ्य समजणाऱ्यांची संख्या आपल्याकडे वाढताना दिसते. तथापि मालदीवमध्ये कोणताही कट न करता आज तो आपल्या मागे आला, हे उदाहरण पुरेसे निदर्शक आहे. भारताची ताकद कट-कपटात नाही, तर शाश्वत, शांततामय सहअस्तित्वात आहे. ते पथ्य आपण पाळू, तोपर्यंत आपला आवाज आहे नि त्याला 'वजन' आहे. शेजारसौख्यातली शालीनता पाहूनच आपले बहुतेक शेजारी चीनच्या नादी लागूनही परत आपल्याकडे येतात, हे असंख्य वेळा दिसून आले आहे. शेजाऱ्यांशी कसे वागू नये हे उदाहरण चीनच्या रूपात सहज उपलब्ध असताना त्यावरून काही न शिकणे योग्य नाही.


## जाहिर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**
**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक,पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता.जि.बीड पिन - ४३११२२**

जावक क्र. ११ दिनांक ०२/१/२०२५ तक्रार क्रमांक : ४१८/२०२४

अर्जदार :- १. शैला प्रकाशराव पांगरीकर. २. प्रकाश मनोहरराव

विरूध्द

गैरअर्जदार :- १. श्री.साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड, मुख्य कार्यालय परभणे इस्टेट कोतवाल गल्ली, सुभाष रोड, बीड, ता.जि.बीड-४३११२२ २. साधना साहीनाथ परभणे, अध्यध्य, चेअरमन श्री.साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड, मुख्य कार्यालय परभणे इस्टेट कोतवाल गल्ली, सुभाष रोड, बीड, ता.जि.बीड-४३११२२ ३. शाहीनाथ विक्रमराव परभणे, सचिव, श्री.साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड, मुख्य कार्यालय परभणे इस्टेट कोतवाल गल्ली, सुभाष रोड, बीड, ता.जि.बीड-४३११२२ ४. शाखा व्यवस्थापक, श्री.साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड, शाखा-शाहुनगर बीड, ता.जि.बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांच्या विरूध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरूध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीसव्दारे आपणास कळविण्यात येते की, विरूध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०५/०२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकील किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरूध्द पक्षांनी याकामी कसून केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.
मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक : ०२/०१/२०२५
ठिकाण : बीड

सही
प्रबंधक
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड

## जाहिर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**
**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक,पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता.जि.बीड पिन - ४३११२२**

जावक क्र. १२ दिनांक ०२/१/२०२५ तक्रार क्रमांक : ४१७/२०२४

अर्जदार :- १. सुनंदा अरूण केदार २. अरूण केदार

विरूध्द

गैरअर्जदार :- २. सुरेश ज्ञानोबाराव कुटे, अध्यक्ष, चेअरमन ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि.बीड-४३११२२ रा.चमडा फॅक्टरी एक आय डी सी बीड ता.जि.बीड. ३. यशवंत वसंतराव कुलकर्णी, व्हाईस, चेअरमन, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड. मुख्य शाखा बीड, ज्ञानराधा भवन, होंडा शोरूमच्या मागे, जालना रोड, बीड, ता.जि.बीड ४. शाखा व्यवस्थापक, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, शाखा : सारडा, बीड, ता.जि.बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांच्या विरूध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरूध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीसव्दारे आपणास कळविण्यात येते की, विरूध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०५/०२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकील किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरूध्द पक्षांनी याकामी कसून केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.
मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक : ०२/०१/२०२५
ठिकाण : बीड

सही
प्रबंधक
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड

## जाहिर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**
**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक,पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता.जि.बीड पिन - ४३११२२**

जावक क्र. १३ दिनांक ०२/१/२०२५ तक्रार क्रमांक : ३२६/२०२३

अर्जदार :- १.रत्नमाला सखाराम कळासे २. सखाराम आश्रुबा कळासे

विरूध्द

गैरअर्जदार :- २. अश्विनी सुनिल वांढरे, मुख्यप्रबंधक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टे को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, राजीव गांधी चौक, ता.जि.बीड. रा. विप्रनगर, ब्राम्हणवाडी, बीड ता.जि.बीड रा. राजीव गांधी चौक, ता.बीड. जि.बीड. ५. बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टे को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, राजीव गांधी चौक, ता.बीड जि. बीड रा. राजीव गांधी चौक, ता.जि.बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांच्या विरूध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरूध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीसव्दारे आपणास कळविण्यात येते की, विरूध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकील किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरूध्द पक्षांनी याकामी कसून केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.
मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक : ०२/०१/२०२५
ठिकाण : बीड

सही
प्रबंधक
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड

## जाहिर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**
**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक,पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता.जि.बीड पिन - ४३११२२**

जावक क्र. १४ दिनांक ०२/१/२०२५ तक्रार क्रमांक : ३२७/२०२३

अर्जदार :- १.सुनंदा भाऊसाहेब परसे २. भाऊसाहेब पांडूरंग परसे

विरूध्द

गैरअर्जदार :- २. अश्विनी सुनिल वांढरे, मुख्यप्रबंधक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टे को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, राजीव गांधी चौक, ता.जि.बीड. रा. विप्रनगर, ब्राम्हणवाडी, बीड ता.जि.बीड रा. राजीव गांधी चौक, ता.बीड. जि.बीड. ५. बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टे को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, राजीव गांधी चौक, ता.बीड जि. बीड रा. राजीव गांधी चौक, ता.जि.बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांच्या विरूध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरूध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीसव्दारे आपणास कळविण्यात येते की, विरूध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकील किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरूध्द पक्षांनी याकामी कसून केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.
मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक : ०२/०१/२०२५
ठिकाण : बीड

सही
प्रबंधक
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड


## पान १ वरून

### खाकीने हात टेकले...

कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे हे तिघे फरार आहेत. प्रयत्न करून सुद्धा ते तिघे तपास यंत्रणेला गुंगारा देत असल्याने ते आरोपी निष्पन्न असून ते खुनासारखा गंभीर गुन्हा केल्यापासून फरार आहेत. त्यांना पकडण्याचे शर्तीचे प्रयत्न पोलिस दलातर्फे चालू आहे. या तिघा आरोपीतांच्या ठाव ठिकाणाची कोणास माहिती किंवा फोटोमधील आरोपी दिसून आल्यास त्यांनी आरोपींची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, सहाय्यक पोलिस अधीक्षक कमलेश मीना, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख किंवा पोलिस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव अत्यंत गोपनिय ठेवण्यात येईल व त्याला योग्य ते बक्षिस देण्यात येईल. असे पोलिसांच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे आवाहन करण्यात आले आहे.

### अंबाजोगाईत इज्तेमा...

अंबाजोगाई ता.अंबाजोगाई येथे होत आहे. या धार्मीक कार्यक्रमाला बीड जिल्ह्यासह इतर जिल्हयातून मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत, सदरील वाहनांना टोल माफी देण्यात यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी पाडळशिंगी येथील आयआरबीचे व्यवस्थापक, हुले कन्स्ट्रक्शन टोलप्लाझा, सेलुअंबा, आस्मी रोड वैद्यकिन्ही टोल प्लाझा (एच.पि.एम.टोल प्लाझा) वैद्यकिन्ही, ता.पाटोदा यांना पाठविले आहे.

### अजित पवारांच्या ताफ्यात...

असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. त्यात आता खासदार बजरंग सोनवणे यांनी वाल्मिक कराड सरेंडर झालेल्या गाडीविषयी मोठा गौप्यस्फोट केल्याने एकच खळबळ उडाली आहे. १२ तारखेला वाल्मीक कराड आणि पोलिस यंत्रणेची नेत्याच्या कार्यालयात भेट झाली. तसेच १५ तारखेला मंत्रिमंडळाच्या शपथविधी सोहळ्यासाठी आरोपी वाल्मिक कराड नागपूरमध्ये हजर होता, असा दावा खासदार बजरंग सोनावणे यांनी केला आहे. ज्या दिवशी हत्या झाली तेव्हा हा आरोपी परळीत होता. हत्या झाल्यानंतर आरोपी आणि पोलिसांची भेट झाली. त्यानंतर हा आरोपी एका नेत्याच्या फार्म हाऊसवर भेटला. त्यानंतर आरोपी शपथविधीला पोहोचतो, तेव्हा अटक का झाली नाही? वाल्मिक कराड हे परळीतून पुण्याला जातो, मग गोवा आणि पुन्हा पुण्याला येतो. त्याचा हा प्रवास सुरु असताना पोलिस काय करत होते? असा सवाल बजरंग सोनावणे यांनी विचारला आहे. अजित पवार १६ तारेखला मस्साजोगला आले, तेव्हा त्यांच्या ताफ्यात जी गाडी होती, त्याच गाडीतून जाऊन आरोपी पुण्यात सरेंडर केले. गाडी कोणाच्या नावावर आहे? असा सवाल करत पुण्यात आरोपी ज्या घरात थांबला त्याचा तपास व्हायला पाहिजे, अशी मागणी बजरंग सोनावणे यांनी केली. संतोष देशमुख यांना खंडणीच्या प्रकरणामुळे मारले आहे. आमच्या खंडणी गोळा करण्याच्या कामात जर अडथळा निर्माण केला तर काय होतं, हे दाखवण्यासाठी असे मारले आहे. मागच्या मे महिन्यात जो गुन्हा दाखल होता, तेव्हा जर कारवाई झाली असती तर हे सगळे घडले नसते. पोलिसांनी वेळीच गुन्हा दाखल केला असता तर हे झाले नसते, असा दावा बजरंग सोनावणे यांनी केला.

### नव्या सरकारचा...

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील तपासाचा आढावा देखील घेण्यात आला आहे. ✻ धनंजय मुंडे यांची उपस्थिती : बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर आरोप होत आहेत. वाल्मिक कराड हा पुण्यात सीआयडीला शरण आला, दरम्यान वाल्मिक कराड याच्याशी असलेल्या जवळीकतेमुळे मंत्री धनंजय मुंडे देखील चर्चेत आहेत. विरोधकांकडून त्यांच्या कोंडीचा प्रयत्न सुरू असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. मात्र आजच्या बैठकीला धनंजय मुंडे यांची उपस्थिती होती. दुसरीकडे मात्र अजित पवार हे या बैठीकला उपस्थित नव्हते. मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर ही राज्य मंत्रिमंडळाची पहिलीची बैठक होती, मात्र या बैठकीला अजित पवार उपस्थित नव्हते. ते परदेश दौऱ्यावर असल्यामुळे बैठकीला उपस्थित नसल्याची माहिती समोर आली आहे.

### पंकजा-धनुभाऊंच्या...

आहे. तसेच पंकजा मुंडे यांच्याकडे असेलल्या पर्यावरण खात्याच्या मुख्य सचिवपदाची जबाबदारी विनिता वेद सिंघल यांच्यावर सोपविण्यात आली आहे. ✻ हर्षदीप कांबळे यांच्या बदलीचा घोळ : बेस्टच्या महाव्यवस्थापक पदी अनिल डिग्गीकर यांची बदली होऊन हर्षदीप कांबळे हे पद स्वीकारणार असे पत्रक काही दिवसांपूर्वी अप्पर मुख्य सचिव यांच्याकडून देण्यात आले होते. परंतु आज अप्पर मुख्य सचिव यांच्याकडून आणखी एक पत्र हर्षदीप कांबळे यांच्याबदली संदर्भात आले. या पत्रात हर्षदीप कांबळे यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई या रिक्त पदाचा भार त्वरित स्वीकारण्यास रुजू सांगितले आहे.

### नव्या सरकारचा लाडक्या...

✻ नेमकं काय म्हणाल्या आदिती तटकरे? : लाडकी बहीण योजनेबाबत ५ प्रकारच्या तक्रारी महिला व बालकल्याण विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. वेगवेगळ्या अँगलने आम्ही या तक्रारीची पडताळणी करणार आहोत. काही तक्रारी या स्थानिक प्रशासनाकडून प्राप्त झाल्या आहे, तर काही लाभार्थी महिलांनी पत्र लिहून योजनेसाठी आता आपण पात्र नसल्याची माहिती दिली आहे. तक्रारी प्राप्त झालेल्या अर्जांची पडताळणी होणार आहे. मात्र मूळ जीआरमध्ये कोणताही बदल होणार नाही असं आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. ✻ कोणत्या अर्जांची पडताळणी होणार? : १) ज्या महिलांचे उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त आहे तरी योजनेचा फायदा घेत आहे अशा अर्जांची होणार स्क्रुटिनी २) चार चाकी वाहनं असलेल्या महिलांच्या अर्जांची होणार पडताळणी ३) एकच महिलेने दोन अर्ज दाखल केले आहेत अशा अर्जांची होणार स्कुटीनी ४) लग्न झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यातून इतर राज्यात स्थलांतरित झालेल्या अर्जांची होणार पडताळणी ५) आधार कार्डवर आणि कागद पत्रावर नावांमध्ये तफावत असलेल्या अर्जाची पडताळणी होणार अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली आहे. दरम्यान अर्ज पडताळणीमध्ये ज्या लाभार्थी महिलांचं उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, किंवा त्यांच्याकडे चारचाकी वाहनं आहेत, अशा महिलांना आता या योजनेतून वगळलं जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. याचा फटका हा राज्यातील अनेक महिलांना बसू शकतो.

### राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची...

ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दुहेरी ऑलिम्पिक पदक जिंकले होते. १० मीटर एअर पिस्तूल वैयक्तिक आणि मिश्र दुहेरीत ती तिसरी राहिली. १८ वर्षीय भारतीय ग्रँडमास्टर डी गुकेशने ११ डिसेंबर रोजी सिंगापूर येथे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. त्याने फायनलमध्ये चीनच्या गतविजेत्या डिंग लिरेनचा ७.५-६.५ असा पराभव केला आणि एवढ्या कमी वयात विजेतेपद पटकावणारा गुकेश हा जगातील पहिला खेळाडू ठरला आहे. यापूर्वी १९८५ मध्ये रशियाच्या गॅरी कास्पारोव्हने वयाच्या २२व्या वर्षी हे विजेतेपद पटकावले होते. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय हॉकी संघाने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये कांस्यपदक आणि २०२२ आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. प्रवीण कुमारने पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये पुरुषांच्या उंच उडीत आशियाई विक्रमासह सुवर्णपदक जिंकून सर्वांना आश्चर्यचकित केले. टोकियो पॅरालिम्पिकमध्ये रौप्य पदक जिंकणाऱ्या प्रवीणने ६४ स्पर्धेत आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी केली आणि २.०८ मीटरची उंची पूर्ण करत इतिहासात आपले नाव नोंदवले.

### मढ्यावरचे जातकारण...

आणले. टीव्हीवाले कराड कराड कराड जप करताना बातम्याचे रतीब घालत आहेत त्यांनी ते घालावे का हा त्यांचा प्रश्न आहे मात्र ज्या सुदर्शन घुले सह आणखी दोघांनी संतोष मारून टाकला त्या घुले वर एकादी बातमी केली का, त्या दिवशीच्या मोर्चात देखील घुले अस नाव तरी एखाद्या वक्त्याने घ्यावे , अरे राजा हो जोवर मुख्य आरोपी अटक होणार नाही तोवर शिक्षा विसरून जा ? कारण मारेकरी हाताशी नसला तर मास्टर बीस्टर विसरा , कुणाला धनंजय मुंडे नको असेल, कुणाला मराठ्याचा नेता व्हायचं असेल , कुणाला मराठ्याचा नेता आपल्या बगलेतला करून मनोज जरांगे यांना मागे सारायचे असेल म्हणजे तशी शंका आहे कुणास ठाऊक इव्हिएम मारकडवाडी आरक्षण मुद्दे गाडायला हत्या कारणी लावायची असेल? काल मुंबईतक या यु ट्यूब वर आ सुरेश धस यांना विचारले आकाचा आका कोण तुम्ही धनंजय मुंडे यांचे नाव .. त्यावर धस म्हणतात ''मी संजय सिंघानिया आहे गझनी शोर्ट टर्म मेमरी'' तिथे असलेल्या बाया खिदी खिदी हसतात . संतोष देशमुख हत्या प्रकरणात चर्चा करताना मुंबईची पत्रकारिता खिदळते दात काढते , मुंबई तक वरील ती महिला भगिनी पत्रकार कोण असेल तिला बोलाऊन घेतले पाहिजे संतोष देशमुख हत्येच्या चर्चेत हसायला कुठला आनंद तिला झाला आहे . व्ह्यूजचा व्यापार करताना बूम वाल्या मिडीयाने बीडची अस्मिता विकली आहे , संतोष देशमुख यांच्या हत्येच्या बातम्यात लाईक व्हूज कमावले आहेत. माफ करा मात्र संतोष देशमुख यांच्या हत्येचे नेत्याकडून राजकारण, मीडियाकडून व्ह्यूज रूपाने अर्थकारण आणि जातीवाद्याकडून जातकारण झाले आहे, मान्य करा किवा नका करू, संतोष देशमुख हत्येचा तपास कासवगतीने आणि राजकारण मात्र सशा सारख्या उड्या मारताना दिसत आहे . मनोज जरांगे यांना साईड हिरो देऊन मराठ्यात आपला माणूस सेट करून या सर्वात मोठ्या आकाने कुठला डाव साधलाय हे कळायला मराठ्यांना सहा महिने लागतील . वाल्मिक कराड यांच्यावर कैमेरे ठेऊन घुले गायब झालाय यावर कुणीतरी आवाज उठवलाय का ? स्थळ पंचनामा, सर्च वारंट, आरोपीची तपासणी ही कामे पोलिसांची आहेत त्यांना ती करू दिली पाहिजे. वाल्मिक कराड किवा आणखी कुणी आरोपी असेल तर त्यांना शिक्षा होईल झालीही पाहिजे मात्र केवळ ठरवून आणि आखून दिलेल्या वाटेने मेंढरासारखे सगळेजन जात असल्याचे वास्तव स्वीकारले पाहिजे. जातीच्या म्हणजे दोन जातीच्या दोन फाका झाल्या आहेत, कुणी बोलणार नाही मात्र हत्येत मराठा वंजारा तणाव निर्माण झाला आहे, पोलिसाकडे पाहताना देखील छातीवरची पट्टी वाचून समज गैरसमज होत आहेत. फेसबुक तर अड्डाच आहे दंगली तणाव घडवायला आणि आपल्याकडे असलेले अफाट ज्ञान पाजळायला फेसबुक शिवाय दुसरी जागाच नाही. संतोष मराठ्यांचा म्हणून पाहणारे आणि वाल्मिक वंजारा म्हणून पाहणारे असे थवे उद्याची काळजी आहे, संतोष यांची हत्या उद्याच्या तणावाचे निमित्त आणि आणखी कुणी संतोष होण्याचे कारण ठरू नये, जखम लपवली तर दुरुस्त होत नाही, आम्ही सर्वांनी मिळून या प्रकरणात तपास-शिक्षा हा मार्ग निवडला पाहिजे, नाहीतर प्रकरण बाजूला, राजकारण आणि जात कारण कडीला जाईल? संतोषचा भाऊ धनंजय दरदर न्याय मागायला जातोय इतर मात्र या प्रकरणात स्वतला चमकून घेतात काहीजण मराठ्यांचे वाली होत आहेत, ''मराठ्यांचा हिरो हा फडणविसांचा साईड हिरो असावा'' हे देखील मिश्कील विषय ठरतो. जात टोकाला गेली आहे बजरंग सोनवणे जिल्ह्याचे खासदार केवळ इंजिन पूजन केले म्हणून विशिष्ट जात आणि पक्षाची फेस्बुकी टोळ खासदारास एकेरी भाषेत बोलताना दिसली , तो केवळ जातीय दर्प आम्ही लक्षात घेतला नाही रोखला नाही तर उद्या नवे प्रश्न आणखी आ वासून उभे राहतील . जातीचे कारभारी वाली झालेले काही लोक दोन जातीत सलोखा निर्माण होऊच द्यायचा नाही म्हणून खाज पोस्ट करतात त्यामुळे आपला संतोष वेगळाच साधतात , त्यात संतोष ची हत्या केवळ भांडवल बनते आणि आरोपी फरार . पोलिसांना बक्षीस ठेवावे लागणे हा शोध मोहिमेचे किती मोठे अपयश आहे , मुंबईचे बूम्बेकर पत्रकार यावर तोंडात फळ घेऊन शांत का असतात , कराड कराड च्या चर्चेत घुले गायब झालाय हे कुणीतरी ठानले पाहिजे ... नाही का ?

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com